## Annexure "A"

दर नमुना करतांना खालील दिलेल्या सुचना, शर्ती व अटी काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.

सुचना :-

१. सहयोगी अधिष्ठाता, भाऊसाहेब फुंडकर शासकीय, कृषि महाविद्यालय, बुलडाणा जि. बुलडाणा (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत) शासकीय शैक्षणिक संस्था/कार्यालयीन कामे असल्यामुळे (GST Act Notification No. 12/2017 Central Tax (Rate) Dated 28/06/2017) मनुष्यबळ पुरविण्यासाठी (GST) लागु नाही.

२. निविदा दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. मुदतीनंतर येणारी निविदा दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

३. किमान वेतन अधिनियम १९४८ च्या अनुषंगाने महाराष्ट शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाची अधिसुचना दि. ०८ ऑगस्ट, २०१४ मध्ये नमुद दराचे अवलोकन करावे.

४. दरपत्रके सिलंबद पाकीटात पाठवावीत, दरपत्रके या निविदा सुचनेचा संदर्भ क्र. नमुद करावा निविदा दरपत्रकातील दर सर्व करांसहीत असावेत दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी, भविष्य निर्वाह, पॅन कार्ड, आधारकार्ड, इ. प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

५. निविदा दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता, भाऊसाहेब फुंडकर शासकीय, कृषि महाविद्यालय, बुलडाणा जि. बुलडाणा** यांच्या नावाने दयावे तसेच पाकीटावर ''कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्याकरीता दरपत्रक'' असे नमुद करावे तसेच दरपत्रकावर मोबाईल नंबर नमुद करावा.

६. निविदा दरपत्रक सन २०२५-२६ पंर्यत वैध राहिल.

७. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा अस्विकारण्याचे तसेच निविदा प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

अटी व शर्ती :-

१. निम्न उल्लेखित नमुद सर्व अटी व शती बधंनकारक राहील.

२. सदर कामे कार्यालयीन दैनदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाण दैनदिन आठ तासाचे काम राहील.

३. कंत्राटी मजुंर कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

४. सदर कामे ही पूर्णत : ठेकेपध्दती/कंत्राटी बाहयस्त्रोता मार्फत करावयाची असल्याकारणाने मजुराच्या वरिष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.

५. कोणत्याही कंत्राटी मनुष्यबळास कामावर ठेवणे वा काढुन टाकणे हे संपूर्ण अधिकार विभाग प्रमुख, कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे कडे आहेत.

६. कामावरील कंत्राटी मनुष्यबळ अपघात वीमा, महागाई भत्ता , भविष्य निर्वाह निधी खाते व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील.

७. कामावरील कंत्राटी मनुष्यबळाला शासन नियमानुसार वेतन देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असले कंत्राटदाराने कामगारास अदा केलेल्या दरमहा E.P.F, गट विमा पावती, वेतन व इतर देय लाभ भरल्यास पावती दरमहा देणे बंधनकारक राहील. त्याशिवाय पुढील महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात येणार नाही.

८. सदर नोंदणी मनुष्यबळ पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे तसेच जी.एस.टी. नोंदणी असल्यास त्या संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावे.

९. शासन नियमानुसार संस्थेचे आयकर कपात करण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर शिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

१०.मनुष्यबळ पुरविण्याचा परवान्याची सत्यप्रत.

११.पॅन कार्ड, आधारकार्ड छायांकित प्रति तथा प्रत्यक्ष काम करणा-या कर्मचा-यांचे आधारकार्ड

१२. EPF नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

१३.व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

१४. ESIC नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

१५.जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

१६.डॉ. पं. दे.कृ. वि, अकोलाने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने सादर करावे.

१७.मागिल वर्षी भरलेले आयकर भरलेल्या विवरण पत्राची सत्यप्रत.

१८.कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायदयातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमुद करु नये थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारीत केलेले दर नमुद करावेत. तथापी कंत्राटदाराने कमीशन यावरच दरपत्रक निश्चित करण्यात येईल. किमान वेतन कायदयानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.

१९.बाल मजुर कायदयाचे पालन करणे सेवा पुरविणा-या कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२०.कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा, ग्रॅच्युएटी, बोनस, विमा योजना,पि.एफ,ई.एस.आय.सी इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत अथवा कोणतीही जबाबदारी कार्यालय व विद्यापीठाची राहणार नाही.

२१.कंत्राटदाराने महाराष्ट शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद वेतन वाटप नोंद, दैनदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वहया ठेवणे व ते संबंधीत अधिका-याकडुन तपासुन घेणे बंधनकारक राहील. व त्याची सर्वस्ती जाबाबदारी कंत्राटदार/पुरवठादाराची राहील.

२२.कामगारच्या वैयक्तीक खात्यावर पि.एफ.विमा व इतर भरणा केलेले चलाने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात देयक सादर करतेवेळी सादर करणे बधंनकारक राहील.

२३.या कार्यालयाचे कामकाज सुटटीच्या दिवशी चालत असल्याने वेळोवेळी मजुरांना सुटटी देणे, कमी जास्त प्रमाणात मजुर पुरवठा करणे व प्रत्येक मजुरांना साप्ताहिक सुटटी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

२४.शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियंमाची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधी कुठलीही जबाबदारी कार्यालयाची किंवा विद्यापीठाची राहणार नाही.

२५.प्रत्येक मजुरांना कॉन्टॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असुन कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२६.कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा,अपघात अथवा मुत्यू संभविल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा.विज, पाउस भूकंप,मशीनरी प्राणी आणि वादळामुळे इजा अपघात मुत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी/विद्यापीठाशी कुठलाही प्रकारचा संबधं राहणार नाही.

२७.कंत्राटी पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्टक्टर/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणारनाही तसे निदर्शनास आल्यास संबंधीतांना करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यांनतर कार्यालयाचा तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधीत ठेकेदारास भाग घेता येणार नाही.

२८.पुरविण्यात येणा-या कुशल व अकुशल मजुरांचा ई.एस.आय.सी.कंत्राटदाराने उतरविणे, बंधनकारक राहील. याबाबतची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२९.दरपत्रक मजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या कामाचा सर्व अटी व शर्तीचा नोटराईज करारनामा रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर त्वरीत करुन दयावा लागेल.

३०.कंत्राटदाराने काम अर्थवट/समाधानकारक नसल्यास सदर कामाचे भुगतान करण्यात येणार नाही.

३१.कामात कुचराई व हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे झालेले नुकसानानुसार दंडासह कंत्राटदारास भरपाई करावी लागेल.

३२.दरपत्रक उघडल्यानंतर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेने लघुत्तम दर सादर कर्त्याशी दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीस राहतील.

३३.कोणतेही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीने राखुन ठेवला आहे.

३४.कार्यालयाकडुन विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्यक वेतन पुढील पाच तारखेपंर्यत संबधीत मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.पी. एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलाने प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. देयकासोबत सादर न केल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.

३५.कामावर ठेवलेल्या मजुरांची हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. संबधीत कार्यालयाचे विभाग प्रमुख केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.

३६.किमान वेतन व वेतन प्रदान अधिनियमातील विहित दरानुसासर विहीत वेळी ठेकेदाराने मजुरांना वेतन दयावे.

३७.कंत्राटदार यांच्याकडुन वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळुन आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करुन विद्यापीठाकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

३८.किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायीत्व विचारात घेवून विद्यापीठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेउन दरपत्रकाचे दर ठरविले जातात तसेच ठेक्यापायी निम्यात येणा-या कामगारांना किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने, प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे निविदा दर केवळ सर्वात कमी दराचे आहे म्हणून स्विकारले जाणार नाही यांची नोंद कंत्राटदारांनी घ्यावी.

३९.कंत्राटदारांचे दर कमी आहे म्हणुन त्यांनाच काम पुरविण्यात येईल असे होणार नाही तर जे कंत्राटदार किमान कायदयाअंतर्गत वेतन व नियमानुसार दर देतील त्यांचे दर स्विकारली जातील.

४०.कामानुसार मजुर पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कामावर एखादया मजुराचे काम कार्यालयात असमाधानकारक वाटल्यास त्याचे जागी तात्काळ दुसरा मजुर बदलुन दयावा लागेल.

४१.इच्छुक दरपत्रक सादर कर्त्याशी आपले दरपत्रक सादर करतांना वेळोवळी निर्गमीत होणारे निर्गमीत होणारे शासकीय/विद्यापीठ/कार्यालय यांचा आदेश/अधिसुचना परिपत्रकाचे काटेकोरपणे पालक करणे तसेच किमान मुळ वेतन, विशेष भत्ता, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करुन दरपत्रक सादर करणे निविदा सादरकर्त्यास बंधनकारक राहील.

४२.शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधीत दरपत्रकात नमुद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीस राहतील तसेच दुस-या क्रमांकाच्या दरपत्रक धारकांने असमर्थता दर्शविल्यास तिस-या क्रमांकाला लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

४३.सदर कंत्राटदारांचे दर हे सन २०२५-२६ या वर्षाकरीता लागु राहतील आणि शासकीय नियमानुसार किमान वेतन कायदयामध्ये होणारे बदल लागु राहतील.

४४.उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे कंत्राटदार निविदा प्रक्रीयामध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

**सहयोगी अधिष्ठाता**
भाऊसाहेब फुंडकर शासकीय
कृषि महाविद्यालय, बुलडाणा
जि. बुलडाणा